


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २१६, शुक्रवार १० मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# कोरोना संकटात नीलेश लंके यांची ऐतिहासिक कामगिरी!

## ■ शरद पवार यांचे गौरवोदगार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ नगर येथे जाहिर सभा ■ सभेस मोठा प्रतिसाद

नगर : विशेष प्रतिनिधी

**ज्यावेळी कोरोनाचे संकट देशावर होते त्यावेळी अनेक लोक परदेशात गेले, घराच्या बाहेर पडले नाहीत. परंतू पारनेरसारख्या दुष्काळी भागात एक स्वतंत्र यंत्रणा उभी करून कोरोना बाधितांना अखंडपणे सुविधा उपलब्ध करून देत त्यांची सेवा करण्याचे ऐतिहासिक काम कोणी केले असेल तर ते नीलेश लंके यांनी केले असल्याचे सांगत गरीबांचे सेवा करणाऱ्या उमेदवाराला मोठया मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.**

नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत शरद पवार बोलत होते. यावेळी संजय राऊत, बाळासाहेब थोरात, अनिल देशमुख, उत्तम जाणकर, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, हिंदकेसरी संतोष वेताळ यांच्यासह जिल्हयातील अनेक मान्यवर तसेच मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, निवडणूकीत परिवर्तन करण्यासाठी स्वच्छ चारित्र्याचा उमेदवार नीलेश लंके यांच्या रूपाने निवडला असून त्यांना विजयी करण्याची तुमची माझी जबाबदारी आहे. मोदींच्या राज्यात लोकशाही आहे का किंवा कितपत राहणार आहे याची चिंता वाटण्याजोगी परिस्थिती आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना जनतेने तीनदा निवडून दिले, लोक त्यांच्या पाठीशी आहेत. ते तुरूंगात आहेत. झारखंडचे आदिवासी मुख्यमंत्री मोदींच्या धोरणाला विरोध करतात म्हणून तुरूंगात आहेत. संजय राऊत, अनिल देशमुख यांनाही तुरूंगात डांबण्यात आले. सत्ता ही जनतेच्या हितासाठी वापरायची असते मात्र विरोधात बोलला की तुरूंगात डांबत सत्तेचा गैरवापर करण्यात येत असल्याचे पवार म्हणाले.

जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक झालीय काय ? निवडणूका घेतल्या नाही, त्यानंतर लोक गप्प बसले व त्यानंतरच्या काळात घटना बदलून आपल्या सोईचा कारभार करण्याचे धोरण असेल तर आपल्याला विचार करावा लागेल असेही पवार म्हणाले.



■ नगर येथे नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची सभा पार पडली.

### शांतीच्या मार्गात मोदींचा अडथळा

मोदींनी नगरमध्ये मुस्लिम समाजाविषयी वक्तव्य केले. या देशात सर्व समाजाला एकसंघ ठेवण्याची आवष्यकता आहे. तरच आपला देश प्रगतीच्या रस्त्यावर जाईल. शांतीचा संदेश महात्मा गांधींनी दिला. याच शहरातील आचार्य आनंदऋषीजी यांनीही शांतीचा दिला. या रस्त्याने जाताना आपला सर्वात मोठा अडथळा नरेंद्र मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचा आहे.

शरद पवार

### राज्यातील गुंडगिरीला फडणवीस कारणीभूत

या शहरात दहशहतवाद, गुंडगिरी, ताबेमारी सुरू आहे त्यांच्याबाबतीत पोलीसांचा दंडूका दिसला नाही. सुजय विखे यांच्या मिरवणूकीत खुनाच्या गुन्हयातील आरोपींचे छायाचित्रे झळकली, त्यांना कायद्याची भिती नाही. दुसरीकडे आमच्या कार्यकर्त्यांना धमकावले जातेय. देशात महाराष्ट्रात जी गुंडगिरी सुरू आहे त्यास कारणीभुत देवेंद्र फडणवीस आहेत.

### तुरूंगातली दोस्ती पक्की !

या सभेसाठी अनिल देशमुख उपस्थित आहेत. ते नागपूरचे टायगर आहेत तर मी मुंबईचा टायगर आहे. त्यांची आणि माझी दोस्ती आहे. तुरूंगातली दोस्ती पक्की असते. ती कधी तुटत नाही. तुरूंगातील अडीअडचणी, संकट, संघर्ष याला एकमेकांची साथ असते, असे दोन टायगर एकत्र आहेत - संजय राऊत

### तीन नवऱ्यांनंतर विकास होतोय का पाहू !

मोदी नगरच्या सभेला आले. विकासावर, देशाविषयी काही बोलले नाहीत. विकास करायला त्यांना लोकांची पोरं लागतात. महाराष्ट्रात फडणविसांना मुख्यमंत्र्यांचा फौजदार केला. विकास होत नाही म्हणून आगोदर नागपूरचा नवरा केला, त्याच्याकडून काही होत नाही म्हणून ठाण्याचा केला. ते फेल झाल्यानंतर आता बारामतीचा केला. तीन तीन नवरे केल्यानंतर आता विकास होतोय का पाहू । अशी उपहासात्मक टीका संजय राऊत यांनी केली.

### औरंगजेब गाडला, नरेंद्र मोदी कोण ?

नरेंद्र मोदी व अमित शहा हे दोघे व्यापारी आहेत. त्यांना महाराष्ट्र लुटून न्यायचा आहे. हे का होतेय ? पूर्वी मोगलांचे हल्ले होत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म महाराष्ट्रात झाला त्यामुळे महाराष्ट्राला इतिहास आहे. औरंगजेबचा जन्म गुजरातमध्ये आणि नरेंद्र मोदींच्या गावात झालाय. इतिहास तपासा. त्यामुळे गुजरातची माती औरंगजेबची माती आहे. त्या मातीतले हे दोघे व्यापारी महाराष्ट्राशी औरंगजेबी वृत्तीने वागत आहेत. औरंगजेबाला आम्ही या मातीत गाडला आहे तर नरेंद्र मोदी कोण आहे ? असा सवाल संजय राऊत यांनी केला.

### कॉमन मॅन इज सुपर मॅन

नीलेश लंके यांच्यासारखा फाटका, फकीर उमेदवार. तुमच्या आमच्यातला सच्चा माणूस. शिवाय ओरीजनल शिवसैनिक आहे. आजूनही शिवबंधन तोडलेले नाही त्यांनी. शिवबंधन मनगटावर आणि मनातही आहे. त्यांची पत्नी, आई, वडील खाली बसले आहेत कारण हा उमेदवार मुळचा शिवसैनिक आहे. तुतारी आपलीच आहे. तुतारी ते वाजवतील एका हातात मशाल घेउन शिवाय पंजाही सोबत आहे. नीलेश लंके संसदेत जाणार कारण कॉमन मॅन इज सुपर मॅन. लंके हे सामान्य माणसाचे प्रतिनिधी आहे.

संजय राऊत
शिवसेना नेते

### लंके यांच्या कौतुकाचा त्रास होऊ लागला

कोरोना काळात केलेल्या कामामुळे नीलेश लंके यांचे जगभर कौतुक झाले. राज्यातले सरकार बदलल्यानंतर जिल्हयातले महसूलमंत्री झाले आणि लंके यांच्या कौतुकाचा त्रास होऊ लागला. लंके यांना आणि जिल्हयालाही त्रास झाला. खोटया केसेस करणे, कामे बंद करणे, त्रास देणे, परवानगीशिवाय भुमीपुजन करण्यास मज्जाव करणे असा त्रास प्रत्येक तालुक्यात झाला. विधानसभा निवडणूकीत हे सगळे आपण बोलणारच आहोत. या पेटलेल्या भटटीतून, त्या अग्निदिव्यातून काय बाहेर आले असेल त्यातून नीलेश लंके यांच्यासारखा कार्यकर्ता तावून सुलाखून बाहेर आला आहे. लंके लोकप्रिय होतोय हे थांबविण्यासाठी आणखी त्रास सुरू झाला तीतकी ही तलवार धारदार होत गेली.

बाळासाहेब थोरात
कॉंग्रेस नेते

### मी सर्टीफाईड गुंड !

गुंडगिरी सोडून द्या हो, आमचे संपूर्ण आयुष्य गुंडगिरीमध्ये गेले आहे. मी तर सर्टीफाईट गुंड आहे. मला त्याचे काहीही वाटत नाही. आम्ही गुंडगिरी केली नसती तर मुंबई आपल्या हातून कधीच गेली असती. नगकरांनो आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. निर्भय बनो. काही लागले तर फोन करा आम्ही येतो. चोऱ्या,माऱ्या, ताबेमारी ही गुंडगिरी आहे काय ? लोक उगाच म्हणत नाहीत सौ दाऊत एक राउत. जरा इतिहास समजून घ्या ! आम्ही मुंबईच्या अंडरवल्डशी लढून त्यांना खतम केले आहे. म्हणून एक राऊत असे राऊत म्हणाले.

### नगरला आमचाच विजय

सर्वाधिक कालखंड महसूलमंत्रीपद मी भुषविले आहे. कधी कुठे बोटे घातली का ? कधी खोटी केस झाली का ? काही त्रासदायक प्रसंग झाला का ? सगळे चांगले करण्याचा प्रयत्न मी केला. हा त्रास कमी करण्यासाठी आम्ही राहत्याची बाजार समिती, गणेश कारखाना, साई संस्थानची कामगार संस्थेच्या निवडणूकीत उतरलो. आता नगरला पोहचलोय विजय आमचाच होणार असल्याचा दावा बाळासाहेब थोरात यांनी केला.

### जिल्हयाचा आजार दुर करणार !

चाळीसपेक्षा अधिक जागा महाविकास आघाडीच्या येणार आहेत. नीलेश लंके लाखोंच्या मताधिक्क्याने विजयी होणार आहेत. परंतू इथपर्यंत थांबून उपयोग नाही. दुखणं बरं करायचे असेल तर ऑपरेशन पुर्णच करावे लागेल. यानंतर विधानसभेसाठी शिर्डी मतदारसंघासाठी आमचा उमेदवार तयार आहे. जिल्हयातील सगळयांना सांगतो की जिल्हा शांततेत, व्यवस्थित चालवायचा असेल, बंधुभावाच्या वातावरणात, लोकशाही मार्गाने चालवायचा असेल तुम्हाला ही कीड काढण्यासाठी सर्वांना एकत्र रहावे लागेल. पक्ष कोणताही असो असे सांगत बाळासाहेब थोरात यांनी मंत्री राधाकृष्ण विखे यांना अप्रत्यक्ष इशारा दिला.

### ते नावालाच राजकारणात

या शहरात मोठया प्रमाणावर दबावतंत्र आहे. शहरातच नव्हे तर शहराच्या अवतीभोवती काही लोक राजकारणात आहेत. ते नावालाच राजकारणात आहेत. त्यांचे खरं काम लोकांना धमकावणे, लोकांना अडचणीत आणायचं, जमीनीवर ताबा लावायचा असे आहे. इकडे ताबा गँग जास्त प्रसिध्द आहे. कितीही मोठा पैलवान असेल तर समोरचा पैलवान घाबरून जाणारा नाही असे रोहित पवार म्हणाले.

### माजी सैनिकाची मदत

माजी सैनिक बबनराव गाडीलकर यांनी त्यांच्या निवृत्तीवेतनातून १ लाख ११ हजार रूपये तर संतोष लंके यांच्यावतीने ५१ हजार रूपयांची मदत या सभेत आ. नीलेश लंके यांच्या निवडणूक निधीसाठी दिली.

### राजकारणात एकच वस्ताद !

राजकारणात एकच वस्ताद आहे, ते म्हणजे शरद पवार. चार तारखेला निकाल लागू द्या, त्यावेळी ते त्यांचा डाव दाखवून देतील. पवार हे असे व्यक्तीमत्व आहे की सकाळी माणूस पाठवायचा, लंकेला आग लावायची आणि दुपारी तीन वाजता माणूस परत आणायचा. ते फक्त शरद पवार करू शकतात असे नितेश कराळे यांनी सांगितले.

### उत्तरेचं कॅलेंडर दक्षिणेत !

विखे पाटलाचं पोरगं इथं आणून ठेवलंय रेडीमेड ! उत्तरचं कॅलेंडर जर दक्षिणेत आणलं.२०२९ मध्ये मतदारसंघांची पुनर्रचना होणार आहे. त्यामुळे तुम्ही विखे यांना निवडून दिलं तर ते उत्तरेचा विकास करतील. कारण त्यांना पुढची निवडणूक तिकडून लढवयाची आहे. तिकडे राखीव आहे म्हणून त्यांनी इकडे उडी मारली असल्याचे नितेश कराळे म्हणाले.

### विखे यांनी ९० शेतकऱ्यांचे अनुदान नाकारले

मी नगरमध्ये फिरत होतो. एक शेतकरी भेटला. त्याने सांगितले की ४० लाख अनुदान आहे म्हणून मी हॉर्वेस्टर खरेदी केले. ४० लाखांचे अनुदान मिळविण्यासाठी राधाकृष्ण विखे यांच्याकडे मंत्रालयात हेलपाटे मारले मात्र अनुदान मिळाले नाही. या अनुदानासाठी शेतकऱ्याने अनेकांना लाचही दिली. असे सुमारे ९० शेतकरी असून त्यांची यादी माझ्याकडे आहे.

नितेश कराळे

### नीलेश भाऊ ३ लाखांनी विजयी होणार !

नगर व श्रीगोंद्याची सभा पाहिली तर मला विश्वास आहे की नीलेश भाऊ तीन लाखांच्या मताधिक्क्याने खासदार होणार आहेत. येत्या तीन जुनला नीलेश लंके हे विजयी झालेले असतील आणि त्या दिवशी सर्वांना गुलाल खेळायचा आहे. महाविकास आघाडीचे किमान ३५ उमेदवार विजयी होणार आहेत, राज्यामध्येही महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचा विश्वास व्यक्त करतानाच इथल्या खासदारांना मला सांगायचे आहे की तुम्ही आता माजी खासदार झालेला आहात, चार जुनला तुम्ही व मोदी निवृत्त होणार आहात. त्याबाबत काळजी करू नका. कारण ही निवडणूक सामान्य जनतेने हाती घेतली असल्याचे रोहित पवार यांनी ठणकावून सांगितले.

### डाव राखून ठेवणारे वस्ताद

सभेला दोन पैलवान व एक वस्ताद उपस्थित आहेत. चंद्रहार पाटील दोनदा महाराष्ट्र केसरी तर संतोष वेताळ हिंद केसरी आहेत तर पवार साहेब पैलवान आहेत, वस्तादही आहेत आणि एक डाव आपल्याकडे ठेवणारे वस्तादही असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

### मराठी माणसाला मोदी घाबरले !

मोदींची सभा नगरमध्ये झाली, शेतकरी हिताचा एक शब्द तरी त्यांनी काढला का ? ते २४ मिनिटे बोलले, त्यापैकी १६ मिनिटे ते हिंदू-मुस्लिम या विषयावर बोलत होते. पहिल्या सभेत ते विकासावर बोलत होते. पहिल्या टप्प्यातील मतदानात हवेतील मतदारांनी भाजपाला नाकारले. दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रकीयेदरम्यान त्यांनी हिंदू मुस्लिम या विषयावर भाषणे सुरू केली. तिसऱ्या प्रक्रियेत ते भटकती आत्मा या विषयावर आले. त्याच्याशी निवडणूकीचा काय सबंध ? पवार साहेबांना तुम्ही असे म्हणताय. तुमच्या भाषणात जे बदल होत आहेत ना आज महाराष्ट्राला दिसतेय की मोदी-शहा घाबरले आहेत. ते एका मराठी माणसाला त्यांचे नाव शरद पवार, उध्दव ठाकरे व कॉंग्रेसच्या नेत्यांचे असल्याचा हल्लाबोल रोहित पवार यांनी केला.

### खोटे बोलण्यात ते पटाईत !

ज्यांना पाच वर्षापूर्वी संसदेत पाठविले त्यांना विचारले काय काम केले तर सांगतात उड्डाण पुल, बाहयवळणमार्ग मी केला. प्रत्यक्षात त्याचे श्रेय स्व. दिलीप गांधी यांना आहे. स्व. अनिलभैय्या राठोड यांनी या कामांचे स्वप्न पाहिले होते. त्याचे श्रेय घेण्याचे काम हे उमेदवार करत आहेत. २०१८ ला पुलास मंजुरी मिळाली. खोटे बोलण्यात हे पटाईत आहेत असल्याचा आरोप नीलेश लंके यांनी केला.




Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
Saint Vivekanand Public School
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

REQUIRED TEACHERS
2024-2025

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024
10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education




# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## Quick Share!

## ना ॲपची, ना इंटरनेटची गरज

एखादी महत्त्वाची फाइल, कार्यक्रमातील कॅमेरात काढलेले फोटो, जास्त एमबीचे व्हिडीओ कसे शेअर करायचे असा प्रश्न अनेकांना पडतो. स्मार्टफोनमध्ये फाइल्स शेअर करण्यासाठी ब्ल्यूटूथ हा पर्याय असतो, पण ब्ल्यूटूथवरून फाइल्स शेअर करणे कठीण जाते आणि मोठ्या फाइल्स शेअर होण्यास अधिक वेळही लागतो; तर आता तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही. कारण क्विक शेअरच्या मदतीने तुम्ही सहज फाइल्स शेअर करू शकणार आहात.



वर्षाच्या सुरुवातीला, गूगलने आपल्या 'निअर बाय शेअर' (Nearby Share) फीचरचे नाव बदलून 'क्विक शेअर' (Quick Share) केलं आहे. हे फीचर विंडोज, क्रोमओएस आणि ॲण्ड्रॉइड उपकरणांवर उपलब्ध आहे. हे फीचर वापरकर्त्यांना फोन, डेस्कटॉप, टॅबलेटमधून फोटो, व्हिडीओ, फाइल्स झटपट शेअर करण्यात मदत करते. तसेच खास गोष्ट अशी की, हे फीचर इंटरनेटशिवाय कार्य करते; त्यामुळे मोबाइल डेटा संपेल याचीसुद्धा वापरकर्त्यांना काळजी करण्याची गरज नाही...

### क्विक शेअर कसे वापरायचे...


क्विक शेअर वापरून फाइल्स पाठवण्यासाठी तुम्हाला जो फोटो, फाइल किंवा लिंक इतरांना पाठवायची आहे ती ओपन करा, त्यानंतर शेअर बटणावर क्लिक करा. आता 'क्विक शेअर' या पर्यायावर टॅप करा, तेव्हा तुम्हाला जवळपासच्या डिव्हाइजची यादी दिसेल. जर तुम्हाला जवळपासच्या पर्यायांची यादी दिसत नसेल तर उजवीकडे असणाऱ्या तीन-डॉट मेनूवर टॅप करा आणि 'सेटिंग्ज'वर क्लिक करा. आता, 'Who can share with you'वर टॅप करा आणि 'व्हिजीबल निअर बाय डिव्हाइज' पर्याय चालू (ऑन) करा. यानंतर आपला फोन जवळच्या डिव्हाइसचा शोध सुरू करेल. तुम्हाला कोणत्या डिव्हाइसवर तुमचे फोटो, व्हिडीओ, फाइल शेअर करायचे आहेत, त्या नावावर क्लिक करा. त्यानंतर फोटो, व्हिडीओ प्राप्तकर्त्याला त्यांच्या डिव्हाइसवर फाइल प्राप्त करण्याची एक सूचना दिली जाईल आणि काही वेळातच फाइल ट्रान्सफर होईल. तर अशाप्रकारे तुम्ही काही मिनिटांत इतरांच्या डिव्हाइसवर फाईल्स ट्रान्सफर करू शकता.

## Google Maps चे 10 सिक्रेट फीचर्स...




**जगभरातील लोक अनोळखी ठिकाणी पहिल्यांदा प्रवास करताना गूगल मॅप्सचा उपयोग करतात. या ॲपच्या मदतीने ठरावीक ठिकाणे, कमी ट्रॅफिक असणारा रस्ता, आजूबाजूचा परिसर यांची माहिती मिळते. त्यामुळे या ॲपचा आता जगभरात वापर होऊ लागला आहे. पण, याच गूगल मॅपमध्ये अशी बरीच फीचर्स आहेत, जी खूप कामाला तर येतीलच; शिवाय तुमचा युजर एक्स्पिरियन्स आणखी भारी होईल. चला तर याबद्दल सविस्तर जाणून घेऊ...**

- जेमिनी एआय गूगल मॅप्सवर संवाद साधू शकते : गूगल मॅप्स नुकतेच जेमिनीद्वारे जनरेटिव्ह एआय क्षमतेने सुपरचार्ज झाले आहे; जिथे तुम्ही आता फक्त व्हॉइस कमांड वापरून विशिष्ट स्थानावर नेव्हिगेशन सुरू करू शकता. बाईक चालविताना तुम्ही या फीचरचा उपयोग करू शकता.
- इलेक्ट्रिक वाहन सेटिंग्ज : EV वाहन वापरकर्त्यांना चार्जिंग स्टेशन शोधणे सोपे जाईल. फक्त Google Maps वर तुमचा चार्जर टाईप निवडा आणि electric vehicle charging stations near me म्हणजेच माझ्याजवळील इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन शोधा यावर क्लिक करा. तुम्हाला गूगल मॅप्स इलेक्ट्रिक वाहनाशी सुसंगत असलेली जवळपासची चार्जिंग स्टेशन्स हायलाइट करून दाखवेल. मग ते दोन, तीन किंवा अगदी चारचाकी वाहन असो.
- गूगल मॅप्ससह तुम्ही 'Travel back in time' हे प्रवास फीचर वापरून काही वर्षांपूर्वी एखादे ठिकाण किंवा स्थान कसे दिसायचे ते पाहू शकता. लक्षात ठेवा की, हे फीचर केवळ निवडक ठिकाणे आणि स्थानांसाठी उपलब्ध आहे.
- मित्र आणि कुटुंबासह लाइव्ह लोकेशन शेअर करा : गूगल मॅप्स वापरून, तुम्ही तुमचे लाइव्ह लोकेशन मित्र आणि कुटुंबातील सदस्यांबरोबर शेअर करू शकता. नवीन ठिकाणी प्रवास करताना तुम्ही या फीचरचा वापर करू शकता आणि इतरांची मदत घेऊ शकता. तुम्ही विशिष्ट कालावधीसाठी किंवा प्रवास संपेपर्यंतही लाइव्ह लोकेशन शेअर करू शकता. जर लाइव्ह लोकेशन शेअर करणे थांबवायचे असेल, तर तुम्हाला ते मॅन्युअली बंद करावे लागेल. लक्षात घ्या की, हे फीचर तुमच्या स्मार्टफोनच्या बॅटरीवर परिणाम करील.
- वाहन पार्किंगचे ठिकाण सेव्ह करा : बऱ्याच शहरांमध्ये पार्किंगची ठिकाणे शोधणे कठीण जाते. त्यामुळे आपण आपली गाडी कुठे पार्क केली आहे हे लक्षात ठेवणे कठीण जाते. तुम्ही 'सेव्ह युवर व्हेईकल पार्किंग' हे



फीचर वापरून तुमच्या वाहनाचे अचूक GPS स्थान चिन्हांकित करू शकता; ज्यामुळे तुम्ही परत आल्यावर कार- बाईक कुठे पार्क केली आहे हे शोधणे सोपे जाईल.
- हवामानाची माहिती मिळवा : तुम्ही ज्या ठिकाणी प्रवास करणार असाल, त्या ठिकाणची रीअल-टाइम हवामानाची थेट माहिती गूगल मॅप तुम्हाला देईल. त्यामुळे अनोख्या ठिकाणी प्रवास करण्यापूर्वी त्या ठिकाणच्या हवामानाचा अंदाज घेता येईल.
- इनडोअर लाइव्ह व्ह्यू : विमानतळ किंवा मोठ्या मॉलमध्ये अनेकदा एकमेकांना शोधण्यात वेळ निघून जातो. कारण येथे नागरिकांची रहदारी मोठ्या प्रमाणात असते. इनडोअर लाइव्ह व्ह्यू या फीचरच्या मदतीने विमानतळ किंवा मॉलमधील विशिष्ट स्टोअर किंवा तुमचे बोर्डिंग गेट सहज शोधू शकता. ही बाब लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, सध्या हे फीचर सध्या फक्त १० हजार ठिकाणांपुरते मर्यादित आहे.
- ऑफलाइन मॅप डाउनलोड करा : प्रवास करताना एक मोठी भीती असते ती म्हणजे कधी नेटवर्क गेले तर; ज्याशिवाय नेव्हिगेशन ॲप बंद होऊ शकते. त्यामुळे प्रवास सुरू करण्यापूर्वी तुम्ही जात असलेल्या ठिकाणचा ऑफलाइन नकाशा डाउनलोड करणे केव्हाही फायदेशीर ठरते. वापरकर्त्यांना गूगल मॅप्सवर विशिष्ट शहरांचे नकाशे डाउनलोड करण्याची सुविधाही मिळते.
- ऑफिस आणि घराचा पत्ता सेव्ह करून ठेवा : ऑफिसला पोहोचायला उशीर झाला असेल, तर कॅब बुक करताना घाई-गडबडीत पत्ता चुकीचा टाकला जाऊ शकतो. त्यामुळे गूगल मॅप्समध्ये घर आणि ऑफिसचा पत्ता सेव्ह करून ठेवा. म्हणजे तुम्ही घराबाहेर पडल्यावर एखादी कॅब बुक करायची असेल, तर तुम्हाला एका क्लिकवर लवकर पोहोचण्याचा जलद मार्ग गूगल मॅप्स दाखवेल.
- एआयसह नवीन ठिकाणे शोधा : सध्या निवडक वापरकर्त्यांसाठी उपलब्ध एआय फीचर गूगल मॅप्सवर नवीन ठिकाणे शोधण्यास मदत करील. तुम्ही पार्टीला जाण्यासाठी नवीन ठिकाणे, किराणा माल खरेदी करण्यासाठी नवीन ठिकाणे गूगल मॅप्सवर शोधू शकता आणि सर्वोत्तम उपलब्ध पर्याय निवडण्यात तुम्हाला एआय मदत करील.

## नाव घ्या, कॉल लागेल...

**काम पटकन व्हावं असं कोणाला वाटत नाही? अशावेळी स्मार्टफोनमध्ये शॉर्टकट्सची मदत घेतली जाते. अनेक लोक असे असतात जे यासाठी शॉर्टकट ॲपचा वापर करता. शॉर्टकट ॲप्समध्ये व्हॉइस डायलिंगसारख्या फीचर्सचा समावेश असतो. त्यामुळे कोणताही फोन नंबर शोधावा लागत नाही. तुम्ही बोलून तो नंबर सहज डायल करू शकता आणि कमांड देऊन त्यावर कॉल करू शकता. यासाठी तुम्हाला फोनला हात लावण्याची देखील गरज नाही. परंतु असे ॲप तुमच्या प्रायव्हसी आणि फोनसाठी सुरक्षित आहेत का? हा एक मोठा प्रश्न आहे, याचा मात्र अनेकजण विचार करत नाहीत आणि जेव्हा पर्सनल डेटा चोरी होतो, तेव्हा डोक्याला हात लावतात. त्यामुळे असे ॲप इंस्टॉल करण्यापूर्वी हजार वेळा विचार केला पाहिजे.**

गुगल प्ले स्टोर आणि ॲप्पल ॲप स्टोरवर अनेक असे ॲप्स उपलब्ध आहेत ज्यांचा वापर केल्याने तुमचं काम पटकन होईल आणि वेळ वाचेल. परंतु हे ॲप तुमच्या संपूर्ण कॉन्टॅक्ट लिस्टसह गॅलरीचा देखील ॲक्सेस मिळवतात. म्हणजे तुमच्या पर्सनल फोटोसह कॉन्टॅक्ट लिस्ट देखील थर्ड पार्टी ॲपच्या हाती जाते. यांचा थेट परिणाम प्रायव्हसीवर होतो. फक्त काही मिनिटे वाचवण्यासाठी तुम्ही तुमची प्रायव्हसी थर्ड पार्टी ॲपच्या हाती गमावता, त्यामुळे डेटा चोरीची शक्यता वाढते. जर तुम्हाला फोन आवाजाने कंट्रोल करायचा असेल तर अँड्रॉइड आणि ॲप्पल डिव्हाइसमध्ये मिळणाऱ्या गुगल असिस्टंट आणि सीरी फीचर्सचा वापर करता येईल. या फीचर्सच्या माध्यमातून तुमचा डेटा लीक होण्याची शक्यता नाही आणि आणि तुम्ही सुरक्षित राहता. अँड्रॉइडवर सर्वप्रथम आपल्या स्मार्टफोनचं पावर बटन प्रेस करा. Google Assistant पावर बटननं ओपन होतं. त्यानंतर स्क्रीनवर Google Assistant दिसू लागेल, आता तुम्ही गुगल असिस्टंटला गुगल हाक मारूनदेखील कमांड देऊ शकता. गुगल तुमची रिक्वेस्ट पूर्ण करेल.

### असं करा इनेबल

जर पावर बटननं असिस्टंट ॲक्टिव्हेट झाला नाही तर फोनमध्ये गुगल ॲप ओपन करा, उजवीकडे तुमच्या प्रोफाईलवर क्लिक करा. त्यानंतर सेटिंग ओपन करा. इथे गुगल असिस्टंटच्या ऑप्शनवर क्लिक करा. त्यानंतर Hey Google आणि Voice Match वर क्लिक करा. त्यानंतर व्हॉइस सिलेक्ट करा आणि इनेबल करा.



### आयफोन युजर्स

आयफोन युजर्स आयफोनमध्ये सीरी फीचर इनबेल करू शकतात आणि आयफोनला स्पर्श न करताच व्हॉइसना कंट्रोल करू शकतात. विशेष म्हणजे ऑथेंटिक ॲप्स व्यतिरिक्त इटकर कोणतेही ॲप वापरणे टाळावे आणि वापरावे लागलेच तर एकदा गुगलवर त्या ॲप्सचे रिव्यू आणि रेटिंग चेक करावे.

## जुना रेफ्रिजरेटर नीट काम करेना?



**उन्हाळ्याने आपले उग्र रूप दाखवायला सुरुवात केली आहे. अशा परिस्थितीत तुमच्या जुन्या रेफ्रिजरेटरने कूलिंग कमी करण्यास सुरुवात केली आहे. याची अनेक कारणे असू शकतात, सामान्यतः असे दिसून येते की फ्रिजमध्ये कूलिंग कमी होण्याचे कारण तांत्रिक नसून सामान्य सवयींमुळे आहे, चला तर मग जाणून घेऊया घरच्या घरी फ्रीजची कूलिंग कशी वाढवता येईल?**

- फ्रीजमधील वस्तूंकडे द्या लक्ष : बरेचदा लोक कमी कॅपिसिटीचा फ्रीज विकत घेतात कारण तो स्वस्त असतो आणि मग त्यात सामान भरून टाकतात. अशा स्थितीत फ्रीजमधील हवेचा प्रवाह योग्य प्रकारे होत नाही. त्यामुळे फ्रीजमध्ये थंडावा कमी होतो. तांत्रिकदृष्ट्या, कोणतेही रेफ्रिजरेटर थंड ठेवण्यासाठी हवेचा प्रवाह आवश्यक असतो. शिवाय, तुमच्याकडे भरपूर सामान असेल तर मोठ्या आकाराचा फ्रीज घ्या, असा सल्लाही दिला आहे.
- तापमानाकडे लक्ष द्या : बरेचदा लोक थंड वातावरणात रेफ्रिजरेटरचे तापमान कमी करतात आणि उन्हाळ्यात तापमान वाढवायला मात्र विसरतात. ज्यामुळे कूलिंगची समस्या उद्भवते. या सामान्य सवयी बदलून कूलिंग वाढवता येते. जर आपण भारताबद्दल बोललो तर



रेफ्रिजरेटरचे तापमान उन्हाळ्यात 35-38°F च्या दरम्यान ठेवावे.
- वॉल्व सील तपासा : फ्रीजच्या दारावर रबर असते, जे फ्रीजमधील हवा बाहेर पडू देत नाही. त्यामुळे फ्रीज थंड राहतो, पण जुन्या फ्रीजमध्ये रबर खराब होण्याची समस्या असते. अशा परिस्थितीत, दरवाजा सील तपासा.
- कंडेनसर कॉइल साफ करणे : कंडेन्सर कॉइल म्हणजे रेफ्रिजरेटरच्या मागे जाळीची जाळी आहे. या जाळीमध्ये धूळ आणि कचरा अडकू शकतो. ज्यामुळे रेफ्रिजरेटर थंड करणे कठीण होते. ही कॉइल वर्षातून एकदा तरी ब्रशने स्वच्छ करा.
- मागील फॅन व्हेंट : रेफ्रिजरेटरच्या मागील बाजूस एक छोटा पंखा बसवला आहे, जो गरम हवा बाहेर टाकतो. अशा स्थितीत मागचा पंखा नीट काम करत आहे की नाही हे नेहमी तपासा. पंखा काम करत नसल्यास, फॅन दुरुस्त करण्यासाठी टेक्निशीयनना कॉल करा.

## एसी देईना थंडावा?

**काही वेळा अनेक सर्व्हिसिंग करूनही, एअर कंडिशनर त्याला कूलिंग मिळणे कठीण होते. जेव्हा असे होते तेव्हा युजर्स खूप अस्वस्थ होतात. जर तुम्हाला तुमच्या एअर कंडिशनरमध्ये अशी कोणतीही समस्या येत असेल, तर काही टिप्स फॉलो करून तुम्ही एअर कंडिशनरची कूलिंग वाढवू शकता...**

सर्वप्रथम, तुम्ही तुमचे एअर कंडिशनर कधीही कमीत कमी तापमानात चालवू नये. जर तुम्ही असे केले तर एअर कंडिशनरचे कूलिंग धोक्यात येते आणि काही महिने चालवल्यानंतर, एअर कंडिशनर योग्यरित्या कूलिंग करणे थांबवू शकते. सीझन संपल्यानंतर जेव्हा तुम्ही एअर कंडिशनर वापरणे बंद कराल. तेव्हा तुम्ही एअर कंडिशनरवर एक कव्हर ठेवावे. खरेतर यामुळे एअर कंडिशनरमध्ये कोणत्याही प्रकारची घाण जाण्यापासून प्रतिबंध होतो आणि पुढील हंगामात त्याची गारवा देण्याची क्षमता देखील कायम राहते. केवळ एअर कंडिशनर खरेदी करून काम होत नाही, तर चांगल्या परफॉर्मन्ससाठी ते तुम्हाला ते वेळेवर सर्व्हिसिंग करून घेणे देखील आवश्यक आहे आणि जर तुम्ही असे केले नाही तर एअर कंडिशनरच्या आत घाण साचू लागते आणि त्यामुळे कूलिंग प्रभावित होते आणि एअर कंडिशनर खराब होते. जर तुम्हाला एअर कंडिशनरच्या महत्त्वाच्या भागांबद्दल माहिती असेल तर तुम्ही ते घरीही सर्व्हिसिंग करू शकता. यामध्ये तुम्हाला मोठी रक्कम खर्च करावी लागणार नाही आणि इतर कोणतेही काम करावे लागणार नाही. जर तुम्ही एअर कंडिशनर चालू असताना त्यावर कोणत्याही प्रकारचे कव्हर ठेवले तर तुम्ही तसे करू नये. कारण त्याचा एअर कंडिशनरच्या कूलिंगवर परिणाम होतो.



### ...तर कमी येईल लाईटबील

- उन्हाळा म्हटलं कि एसीचा वापर वाढून जातो. एसीच्या या वाढत्या वापराबरोबरच सुरू होते वीज बिलाची समस्या मग वाढत्या उकाड्या बरोबरच वाढते वीज बिलही हैराण करू लागते. अशा वेळी काही टिप्स फॉलो केल्यास आपण आपले लाईट बिल कमी करू शकतो.
- करा योग्य एसीची निवड : जर तुम्ही नवीन एसी घेत असाल तर तो तुमच्या रूमच्या साईजनुसार अनुकुल आहे याची खात्री करा.
- कुठला एसी निवडावा : साधारणपणे १००० स्क्वेअर फीट एरिया साठी १ टन, १५०० एरियासाठी १.५ टन तर त्याच्यावरती २टन एसीची निवड करावी.
- सर्व्हिसिंग करणे : उन्हाळा सुरू होण्याआधीच एसीची सर्व्हिसिंग करून घ्यावी. कारण आधीचा पूर्ण सीझन एसी बंद असल्याने त्याच्यात कचरा साचतो.
- फिल्टर साफ करणे : एसीचे फिल्टर वेळोवेळी साफ केल्याने एसी अधिक कार्यक्षम राहते. तसेच वेळोवेळी गरजेनुसार फिल्टर बदलून घ्यावे.

## किती जीबी रॅमचा फोन घ्यावा?

**स्मार्टफोन खरेदीवेळी रॅमची निवड एक मोठा आणि महत्वाचा प्रश्न अनेकांना सतावतो. यामुळे अनेकांचा गोंधळ उडतो की त्यांच्यासाठी किती जीबी रॅम असलेला स्मार्टफोन बेस्ट आहे. या प्रश्नाला ठराविक असं उत्तर देणं तसं कठीण काम आहे. कारण प्रत्येकाची गरज वेगळी असते. त्यानुसार रॅमची आवश्यकता बदलते. तुम्ही स्मार्टफोन किती आणि कशासाठी वापरता यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून असते.**

- जर तुम्ही फोन अत्यंत बेसिक कामांसाठी म्हणजे कॉल, मेसेज, वेब ब्राउजिंग, सोशल मीडियासाठी वापरण्यासाठी करत असाल तर तुमच्यासाठी ४ जीबी रॅम असलेला फोन बेस्ट ठरेल. जर तुम्ही फोनमध्ये गेमिंग, व्हिडीओ एडिटिंग असं मल्टीटास्किंग करत असाल तुमच्यासाठी ६ जीबी ते ८ जीबी रॅम असलेला स्मार्टफोन योग्य ठरेल. जर तुम्ही हेव्ही गेमिंगसाठी फोन वापरत असाल तसेच ४ के व्हिडीओ एडिटिंग करत असाल तर तुमच्यासाठी १२ जीबी रॅम असलेला फोन हवाच.
- प्रोसेसर किती हवे? : कोणत्याही फोनच्या स्पीडसाठी प्रोसेसर देखील तितकाच महत्वाचा आहे. म्हणून चांगला प्रोसेसर कमी रॅमसह देखील चांगला स्पीड देतो. जर फोनचा प्रोसेसर जुना असेल तर सोबत जास्त रॅम आवश्यक आहे. जर तुम्ही फोन दीर्घकाळ वापरणार असाल तर तुमच्यासाठी ६ जीबी रॅम बेस्ट ठरेल.
- जास्त रॅममुळे फोनचे नुकसान : विशेष म्हणजे जितका जास्त रॅम तितकची फोनची किंमत वाढते. तसेच जास्त जीबी रॅम असलेल्या फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होते. फोनची देखील यात महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे युजर्सना जास्त जीबी स्टोरेज असलेला स्मार्टफोन खरेदी केला पाहिजे.
- वर्चुअल रॅम म्हणजे काय? : वर्चुअल रॅम म्हणजे फोनला जेव्हा हवं तेव्हा अतिरिक्त रॅमची ताकद देणं. परंतु यासाठी फिजिकली रॅम जोडला जात नाही तर इंटर्नल स्टोरेजचा वापर केला जातो. याला वेगवेगळ्या कंपन्यांनी वेगवेगळी नावं दिली आहेत. उदाहरणार्त सॅमसंग 'रॅम प्लस', रियलमी 'डायनॅमिक रॅम' आणि विवो 'वर्चुअल रॅम' म्हणते.

## शॉर्ट न्यूज

### ११ मे पासून अमरण उपोषण करण्याचा ईशारा

■ **नगर :** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या १४ मे जयंतीच्या दिवशी प्रोफेसर चौकात पुतळा बसवण्याच्या मागणीसाठी अनेक पत्रव्यवहार करून देखील अद्यापही कारवाई करण्यात आलेली नसल्याने छावा संघटनेच्या वतीने अहमदनगर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे की १४ मे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुतळा बसवण्यात यावा अन्यथा ११ मे पासून उपोषण सुरू करणार असल्याचे निवेदन देण्यात आले.

### अपघातात रिक्षा चालकाचा मृत्यू

■ **श्रीरामपूर :** नेवासा रस्त्यावरील रेल्वे ओव्हरब्रीजजवळ ट्रकने रिक्षाला धडक देऊन झालेल्या अपघातामध्ये रिक्षा चालकाचा मृत्यू झाला आहे. फिरोज बनेखाँ पठाण असे मृत रिक्षा चालकाचे नाव आहे. काल दुपारी श्रीरामपूरकडून नेवासाकडे जाणाऱ्या मालट्रकने रिक्षाला धडक दिल्याने फिरोज पठाण याचा जागीच मृत्यू झाला. ट्रकच्या धडकेत रिक्षा ट्रकच्या पुढील भागाखाली दबली गेल्याने रिक्षा क्रेनच्या साहाय्याने बाजूला केली. पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### पहिल्या दिवशी ४९ वयोवृद्ध व अपंगांचे मतदान

■ **नेवासा :** ८५ वर्षाहून अधिक वयाच्या वृद्ध व्यक्ती व जे मतदान केंद्रापर्यंत पोहचण्यास अक्षम आहेत अशा अपंग व्यक्तींना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी निवडणूक आयोगाने त्यांच्या घरी जाऊन मतदान करुन घेण्याच्या दिलेल्या निर्देशानुसार नेवासा तालुक्यात ही प्रक्रिया राबविण्यात आली. पहिल्या दिवशी १०३ पैकी ४९ मतदारांचे मतदान करुन घेण्यात आले. ४५ वयोवृद्ध मतदार व ४ अपंग मतदारांचे त्यांच्या घरी पथकाने भेट देवून मतदान करुन घेतले. गटविकास अधिकारी संजय लखवाल यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही प्रक्रिया राबविली.

### घोडेगावात कांद्याचे भाव घसरले

■ **घोडेगाव :** नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार घोडेगाव येथील कांदा मार्केटमध्ये कांद्याच्या आवकेत सोमवारच्या तुलनेत बुधवारी मोठी वाढ झाली. कांद्याची ६९ हजार ७९० गोण्या आवक झाली. भावातही मोठी घसरण झाली. भाव १८०० रुपयांपर्यंत मिळाले. एक-दोन लॉटला १८०० ते १९०० रुपये भाव मिळाला. मोठ्या कांद्याला १६०० ते १७०० रुपये, मुक्कल भारी १५०० ते १६०० रुपये, गोल्टा १२०० ते १३०० रुपये, गोल्टी ८०० ते ९०० रुपये तर हलक्या डॅमेज कांद्याला ४०० ते ५०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला.

### महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत पळवीली

■ **राहुरी :** कामीनी सिताराम वाबळे, रा. ताहराबाद रोड, वरशिंदे, ता. राहुरी. या रात्रीच्या दरम्यान त्यांचे पती व मुलांसह घरात झोपले होते. पहाटे ४ वाजे सुमारास एक अज्ञात भामटा दरवाजाची कडी उघडुन वाबळे यांच्या घरात घुसला. तेव्हा भामट्याने कामीनी वाबळे यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाची सोन्याची पोत काढून घेतली. कामीनी वाबळे यांना जाग आली आणि त्यांनी आरडाओरोडा केला. मात्र सदर भामटा अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. कामीनी सिताराम वाबळे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# तब्बल ५५ वर्षांनी भेटले जुने सवंगडी!

## जुन्या आठवणींना मिळाला उजाळा



**नगर : प्रतिनिधी**

**पंचावन्न वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनास उपस्थित राहण्याचा क्षण एखाद्याच प्राध्यापकाच्या जीवनात क्वचितच येतो. तो क्षण माझ्या वाट्याला आला. त्यामुळे माझं मन समाधानाने, आनंदाने भरून पावले आहे, अशा भावना प्रा. प्रताप यांनी व्यक्त केल्या. प्रसंग होता १९६९-७० सालच्या शास्त्र विभागाच्या प्री डिग्री वर्षाच्या विद्यार्थ्यांचा ५५ वर्षांनंतर झालेल्या स्नेहसंमेलनाचा , ५५ वर्षांनंतर पुन्हा भेट झाल्याने या विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. अहमदनगर क्लब येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास पुणे शहर व नगर जिल्ह्यातील ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.**

स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून रसायन शास्त्राचे तत्कालीन प्रा. प्रताप सर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्नेहसंमेलनास सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी पुणेरी पगडी देऊन प्रताप सरांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जुन्या काळातील आठवणींना उजाळा दिला. त्या वेळचे अनुभव कथन करताना अनेक विद्यार्थ्यांच्या भावना दाटून आल्या. यावेळी ७३ वर्षीय माजी विद्यार्थी लेंडे यांनी योगाची प्रात्यक्षिके दाखवून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. सर्व माजी विद्यार्थ्यांनी अहमदनगर महाविद्यालयात जाऊन ५५ वर्षांपूर्वी ज्या वर्गात, ज्या बाकावर बसून शिक्षण घेतले होते त्या वर्गाला भेट दिली. तेथे बाळासाहेब पतंगे आणि जयश्री जगताप यांनी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

या स्नेह मेळाव्याचे आयोजन केल्याबद्दल उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी संयोजकांचे आभार मानले. या कार्यक्रमाची प्रस्तावना माजी नगरसेवक सतीश लांडगे यांनी करून उपस्थितांचे स्वागत केले. ५५ वर्षांनी सर्व सवंगडी एकत्र केल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. राजेंद्र डांगरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# अक्षय्य तृतीया : परंपरा आणि महत्त्व



आपल्या पंचांगाप्रमाणे सूर्योदयाची तिथी मानण्याची प्राचीन परंपरा असल्यामुळे अक्षय्य तृतीया १० मे २०२४ रोजी साजरी केली जाणार आहे. या दिवशी सुरू केलेल्या कुठल्याही कार्याचा क्षय होत नाही असे म्हणतात शिवाय या दिवशी आपण ज्या वस्तुंचे दान करतो त्या अक्षय प्रमाणात म्हणजेच विपुल प्रमाणात पुन्हा आपल्याला मिळतात म्हणुन अक्षयतृतीयेचं विशेष महत्व समजल्या जातं. वैशाख मासातील शुक्ल पक्षातील तृतीया ही अक्षय तृतीया म्हणुन प्रसिध्द आहे. या दिवशी पाण्याचे दान करण्याचा देखील प्रघात आहे. या दिवसाला इतके महत्व का आहे जाणून घेऊया यासंबंधी आणखी काही गोष्टी.

**दान व हवनाला महत्व**

आपल्या प्राचीन संस्कृती, परंपरांमध्ये साडेतीन मुहूर्त अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहेत. त्यापैकी एक अक्षय्य तृतीया असल्यामुळे यालाही अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. श्रीकृष्णाने युधिष्ठिराला असे सांगितले होते की, या तिथीस केलेले दान व हवन क्षयाला जात नाही. म्हणून ही तिथी अक्षय्य मानली गेली आहे. देव आणि पूर्वज यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय्य (अविनाशी) होते. जो मनुष्य या दिवशी गंगा स्नान करेल, तो सर्व पापांतून मुक्त होतो, अशी मान्यता आहे. या दिवशी विष्णूंचा सहावा अवतार परशुराम यांची पूजा करून त्यांना अर्घ्य दिले जाते.

**माठ आणि फळांचा राजा आंब्याला महत्व**

वैशाख महिना हा अत्यंत उष्ण असतो. त्यामुळे अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने मातीचे माठ किंवा रांजण दान करावे. मातीच्या माठातील पाणी आरोग्यासाठी उत्तम राहते. तसेच फळांचा राजा आंबा प्रामुख्याने अक्षय्य तृतीयेपासून खाण्यास सुरुवात होते. अक्षय्य तृतीयेला केलेले नामस्मरण किंवा मंत्र पठण अखंड टिकून राहते, अशा मान्यता आहे. याशिवाय अक्षय्य तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा देवी प्रकट झाली होती, असेही सांगितले जाते.

**या घटना याच दिवशी घडल्या**

अक्षय्य तृतीयेपासून त्रेतायुगाचा प्रारंभ झाला, असे मानले जाते. अक्षय्य तृतीयेपासून चारधाम मानल्या गेलेल्या बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री आणि यमुनोत्रीची द्वारे खुली केली जातात. याच दिवशी नर-नारायण आणि परशुराम यांचे अवतरण झाले होते, अशी मान्यता आहे. त्रेतायुगातच महाभारत घडले होते. याच युगात जगत्कल्याणासाठी भगवान विष्णू श्रीकृष्ण अवतरात प्रकट झाले आणि कालातीत असलेल्या भगवद्गीतेची अमृत वाणी संसाराला प्राप्त झाली. त्याचप्रमाणे अक्षय्य तृतीयेच्या दिवशी हयग्रीव आणि बसवेश्वर यांचा जन्म झाला होता.

# जिल्ह्याच्या जलसिंचन प्रकल्पासाठी पाहिजे तेवढा निधी देणार

■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही ■ खा.डॉ.विखेंच्या प्रचारार्थ जामखेडला सभा



**जामखेड : प्रतिनिधी**

**नगर जिल्हा दुष्काळमुक्त करण्याचे धोरण महायुती सरकारचे आहे. जिल्ह्यातील दक्षिण आणि उत्तर भागाकरिता सुरू असलेले जलसिंचनाचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पाहिजे तेवढा निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. जामखेड येथे महायुतीच्या प्रचार सभेत बोलत होते.**

अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदार संघाचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ आमदार प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड, बाजारतळ येथे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह आमदार सुरेशअण्णा धस, भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे प्रवक्ते उमेश पाटील यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ही निवडणूक गल्लीतील निवडणूक नसून देशाचा नेता ठरवणारी निवडणूक आहे. या देशाला कोण सुरक्षित ठेवू शकतो, देशाला कोण विकासाकडे नेवू शकतो. आणि सामान्य मानसाच्या आशा आकांक्षा पुर्ण करू शकतो याचा फैसला करणारी निवडणूक आहे. यामुळे पंतप्रधान पदांची संगीत खुर्ची खेळणाऱ्यांच्या मागे जावू नका.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सबका साथ सबका विकास म्हणत देशाला विकासात पुढे आणले आहे. यामुळे डॉ. सुजय विखे यांना मत म्हणजे मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मत ही जाणीव ठेवा असा सल्ला दिला.

उपमुख्यमंत्री फडणवीसांनी मागील १० वर्षात पंतप्रधान मोदींच्या मार्फत झालेल्या कामांचा उवापोह करत इंडी आघाडीचा सडेतोड समाचार घेतला. त्यांनी सांगितले की, मोदींकडे विकासाची गाडी असून त्यात महायुतीच्या पक्षांचे डबे आहेत आणि त्यात सर्व सामान्य जनतेला जागा आहे. तर इंडीकडे केवळ इंजिन आहेत आणि इंजिनमध्ये कुणाला जागा नाही.

काँग्रेसच्या काळात ऊस शेतकऱ्यांवर १० हजार कोटी रुपयांचा इनकम टॅक्स होता. पंतप्रधान मोदी सत्तेत आल्यावर त्यांनी कायदा बदलून हा टॅक्स रद्द करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. त्याच बरोबर मोदी सरकार च्या माध्यमातून शेतकऱ्यांना २४ तास वीज दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. सुजय विखे यांनी मागील पाच वर्षात जिल्ह्यात विकासाची भरगोस कामे केली आहेत. जिल्ह्यातील सर्व प्रकारचा दुष्काळ कमी करण्यासाठी त्यांनी विविध मागण्या केल्या आहेत. येणाऱ्या काळात सुजय विखेंच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जिल्ह्याचा दुष्काळ आपल्याला संपवायचा आहे. यामुळे येत्या १३ तारखेला कमळ चिन्हाचे बटण दाबून सुजय विखे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी आमदार सुरेश अण्णा धस, आमदार राम शिंदे, डॉ. सुजय विखे पाटील, चित्राताई वाघ यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

# मतदान केंद्रात मोबाइलला नो-एन्ट्री



**नगर : प्रतिनिधी**

**मोबाइल हा प्रत्येकाच्याच जीवनात सवयीचा भाग बनला असला, तरी १३ मे रोजी सजग नागरिकांना मोबाइलपासून काही काळ दूर राहावे लागणार आहे. मतदानाची प्रक्रिया सोमवार (ता. १३) राबवण्यात येणार असून मतदान केंद्रांवर मोबाइल नेण्यास मनाई असल्याचे जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांना मोबाइल घरी ठेवूनच मतदानासाठी बाहेर पडावे लागणार आहे.**

नगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी जिल्हा निवडणूक आयोगाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. मतदान करतानाचे फोटो किंवा व्हिडिओ काढण्यास देखील मनाई केली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत निर्भय व न्याय वातावरणात पार पडावी, यासाठी मतदान केंद्र परिसरात कलम १४४ लागू असणार आहे. अधिकृत निवडणूक कर्मचारी व पोलिसांना सवलत देण्यात आली आहे.









# सुपा बाजारात मोबाईल चोरणारी टोळी सक्रिय

■ गेल्या आठवड्यात १६ तर बुधवारी ५ मोबाईल चोरट्यांनी लांबवले ■ सुपा पोलिसांसमोर मोठे आव्हान

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या सुपा शहरात बुधवारी आठवडे बाजारात मोबाईल चोरणारी टोळी सक्रिय झाली असून दिवसा ढवळ्या महागड्या मोबाईलवर चोरटे डल्ला मारण्यात यशस्वी झाले आहेत. या चोरांना खाकी वर्दी दाखवून आपला वचक निर्माण करण्याचे मोठे आव्हान नुतन पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या समोर आहे.**




ग्रामीण भागातील सुमारे वीस ते बावीस गावांची मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा शहरात दिवसेंदिवस झपाट्याने लोकसंख्या वाढत आहे. त्यात सुपा येथील जुनी औद्योगिक वसाहत व म्हसणे फाटा येथील नवी औद्योगिक वसाहत यामुळे अधिकारी व कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. बुधवारी आठवड्यातून एक दिवस मुख्य बाजार याठिकाणी भरतो. खासकरून सायंकाळी पाच ते सात दरम्यान कंपनीतील कामगार सुटल्यानंतर बाजारात मोठी गर्दी होते. याचाच फायदा घेऊन मोबाईल चोर काही क्षणातच खिशातील मोबाईल वर डल्ला मारतात. यापुर्वीही अनेक मोबाईल चोरीला गेले आहेत. मध्यंतरी एक मोबाईल चोर चोरी करताना पकडला होता. ग्रामस्थांनी त्याची यथेच्छ धुलाई करीत पोलिसांच्या ताब्यात दिला. त्या मोबाईल चोराला अटक होऊनही अद्याप मोबाईल चोरांवर वचक बसवण्यात पोलीसांना अपयश आले आहे.

बुधवार दि. ९ रोजी सायंकाळी साडेपाच ते साडेसहा दरम्यान भोयरे गांगर्डा येथील राजेंद्र भानुदास रसाळ हे बाजार करण्यासाठी बाजारात गेले असता वरच्या खिशात ठेवलेला मोबाईल चोरट्यांनी लंपास केला. मोबाईल चोरी केल्यानंतर काही क्षणातच तो बंद केला गेला. यानंतरही पाच ते सहा जनांचे मोबाईल चोरीला गेले. आठ दिवसांत २१ मोबाईलवर चोरट्यांनी डल्ला मारला असून याची सर्वसामान्य नागरिकांना मोठी झळ बसली आहे.

दरम्यान नुतन पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंदयावाल्यांवर अंकुश बसविला आहे. मावळेवाडीसह परिसरात ताडी भट्टीवर कारवाई करत आपली एक नवी ओळख निर्माण केली. सुपा परीसरात अवैध धंदे मोठ्या प्रमाणात आहेत. मोटरसायकल चोरीच्या घटना देखील यापूर्वी अनेक घडल्या आहेत. आता बाजारात मोबाईल चोरणारी टोळी सक्रिय झाली असून त्याचा बिमोड करण्यासाठी पोलीसांना कंबर कसावी लागणार आहे. वाढत्या अतिक्रमणाची देखील त्यात भर पडली असून बाजाराच्या दिवशी किमान तीन ते चार पोलीस कर्मचाऱ्यांची याठिकाणी नियुक्ती करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

### रस्त्यावर भरतो बाजार

**सुपा ग्रामपंचायतीने भाजी विक्रेत्यांसाठी शेडची व्यवस्था केली आहे. परंतु या शेडमध्ये जागा उपलब्ध असताना भाजी विक्रेते व इतर व्यावसायिक भर रस्त्यात आपली दुकाने थाटतात यामुळे गर्दीत आणखी भर पडते. याकडे ग्रामपंचायत जाणीवपूर्वक डोळे झाक करताना दिसत आहे. ग्रामपंचायत कर घेते मग विक्रेत्यांना बसवण्याची व बाजारात शिस्त लावण्याची जबाबदारी कोणाची असा थेट सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.**

### चोर गर्दीचा फायदा घेतात

**कंपनी कामगार सुटल्यानंतर सायंकाळी बाजारात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. याचा फायदा घेऊन चोर मोबाईलवर हात साफ करतात. नागरिकांनी बाजारात येताना आपल्या मौल्यवान वस्तू जसे की डाग दागिने घरी किंवा सुरक्षित ठेवावे. मोबाईल हा शक्यतो खालच्या खिशात ठेवावा. मोबाईल विकत घेतल्यानंतर त्यावरील आय एम ई आय हा नंबर मोबाईल बरोबर किंवा बिलावर दिला जातो तो सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. अनेक जणांकडे फिर्याद देताना तो नंबर मिळत नाही त्यामुळे मोबाईलचा शोध घेणे अवघड जाते.**

**अरूण आव्हाड**
**पोलीस निरीक्षक सुपा.**

# ॲड कोल्हे यांची आ. लंके यांनी घेतली भेट

पोलिसांनी गुंडगिरीला चाप लावण्याची मागणी

नगर : प्रतिनिधी

**न्यायालयाच्या आवारात करण्यात आलेल्या हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या ॲड. अशोक कोल्हे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आ. नीलेश लंके यांनी नगर येथील रूग्णालयात जाऊन त्यांची भेट घेत विचारपूस केली.**



■ न्यायालयाच्या आवारात करण्यात आलेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या ॲड. अशोक कोल्हे यांची आ. नीलेश लंके यांनी रूग्णालयात भेट घेऊन विचारपूस केली.

लंके यांनी ॲड. कोल्हे यांना धीर देत आम्ही सर्वजण तुमच्यासोबत असल्याची ग्वाही दिली. ॲड. कोल्हे यांच्याकडून घटनेचा तपशील जाणून घेतल्यानंतर वकीलांवर होत असलेल्या हल्ल्यांबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. कायद्याची सेवा आणि रक्षण करणारांवर अशा पध्दतीने होणारे हल्ले चिंताजनक असून त्याचा आपण निषेध करीत असल्याचे लंके म्हणाले.

ॲड. अशोक कोल्हे यांची प्रकृती हळूहळू सुधारत असून ते लवकरच आपल्या कामावर रूजू होतील असा विश्वास व्यक्त करतानाच त्यांची प्रकृती लवकर बरी व्हावी यासाठी त्यांनी ईश्वराकडे प्रार्थना केली.

पत्रकारांशी बोलताना आ. लंके म्हणाले, सर्वसामान्य शेतकऱ्यांवर, सर्वसामान्य जनतेवर ज्यांच्यावर अन्याय, अत्याचार होतो त्यांना न्याय देण्याचे काम करणाऱ्या वकीलावरच नगर शहरात हल्ला झाला होतो हे कायदा व सुव्यवस्थेची काय स्थिती आहे हे निर्देशित करत आहे. तीन-चार महिन्यांपूर्वी राजाराम आढाव व त्यांची पत्नी या वकील दाम्पत्याची निर्घुण हत्या झाली.

नगर शहरातील पोलीस प्रशासनास माझी विनंती आहे की त्यांनी शहरातील गुंडगिरी, दहशतीच्या विरोधात ठोस पाऊल उचलली पाहिजेत. कायदा व सुव्यवस्थेकडे लक्ष देण्याऐवजी आज पोलीस प्रशासन आमच्यासारख्या राजकीय व्यक्तींवर लक्ष ठेउन,आमच्या कार्यकर्त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला जातो. त्यापेक्षा अशी गुंडगिरी करणारांना पायबंद घालण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन आ. लंके यांनी केले.

# काशिनाथ खोसे पाटील यांचे निधन

पाडळी दर्या : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील पाडळी दर्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे माजी व्हाईस चेअरमन काशिनाथ महादेव खोसे पाटील यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी अल्पशः आजाराने निधन झाले.**

अतिशय कडक व स्वच्छ राहणीमान आणि स्पष्ट वक्ते असलेले व्यक्तिमत्त्व होते . त्यांच्या पश्चात पत्नी मंजुळाबाई , तीन विवाहीत मुले , मोठा मुलगा व नगरच्या सुप्रसिद्ध शुभ हेल्थ केअर फर्मचे संचालक दिलीप , महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पारनेर तालुका उपाध्यक्ष सुरेश, महानगर बँकेतील कर्तव्य



दक्ष कर्मचारी प्रकाश व मुंबई येथे असलेली विवाहीत मुलगी वैशाली , सुन पत्रकार निलम यांचे सासरे होत. त्यांच्या पश्च्यात सुना, नातवंडे, जावई परिवार होत . त्यांच्या निधनाने पारनेर तालुक्यात दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

# संविधान वाचविण्यासाठी ११ हजारांची मदत !

■ बौध्दाचार्य संजय कांबळे यांनी आ. लंकेंकडे केला धनादेश सुपूर्द
■ आरपीआय आंबेडकर गटाचा लंकेंना पाठींबा



नगर : प्रतिनिधी

**देशाचे संविधान वाचले पाहिजे अशी भूमिका घेत बैध्दाचार्य संजय कांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार नीलेश लंके यांना ११ हजार रूपयांचा निवडणूक निधी दिला. दरम्यान आर पी आय आंबेडकर गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक निकाळजे यांच्या आदेशान्वये या पक्षाचा निलेश लंके यांना पाठींबा जाहिर करण्यात आला आहे.**

शेखर पंचमुख यांनी सांगितले की, बहुजनांना अभिमान वाटेल असे काम बौध्दाचार्य संजय कांबळे हे करीत असून संविधान राहते की नाही अशी स्थिती निर्माण झालेली असताना संजय कांबळे यांनी पुढाकार घेत सर्वसामान्यांचे प्रतिनिधी म्हणून नावलौकीक प्राप्त झालेले तसेच कोरोना संकटात हजारो रूग्णांना उपचार देउन त्यांना जीवनदान देणारे नीलेश लंके यांना निवडणूक निधी म्हणून ११ हजार रूपयांची मदत दिली आहे. हा धनादेश आ. नीलेश लंके यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

दरम्यान, येत्या १३ मे रोजी होणा-या नगर दक्षिण लोकसभा निवडणूकीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाचे उमेदवार नीलेश लंके यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गटाच्या वतीने पाठींबा जाहिर करण्यात आला असून तसे पत्र आ. नीलेश लंके यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रदीप मकासरे, जिल्हा संपर्क प्रमुख रोहित आव्हाड, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष शशिकांत दरोळे, युवक जिल्हाध्यक्ष रॉकी लोंढे, नगर तालुकाध्यक्ष मुसला धनगर, पारनेर तालुकाध्यक्ष किरण सोनवणे, नगर शहराध्यक्ष हरीश अल्हाट, सुवक शहराध्यक्ष संदीप वाघमारे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष जयाताई डोळस आदी पदाधिकाऱ्यांसह आंबेडकरी जनसमुदाय उपस्थित होता.

# निकाली कुस्त्यांनी वेताळबाबा यात्रेची सांगता

हजारो भाविकांनी घेतले भक्तीभावने दर्शन

गाडीलगांव : प्रतिनिधी

**गाडीलगांवचे ग्रामदैवत वेताळबाबांचा यात्रोत्सव यंदाही मोठया भक्तीभावाने संपन्न झाला. निकाली कुस्त्यांच्या आखाडयाने यात्रोत्सवाची सांगता झाली.**



मंगळवारी सकाळी सात वाजता वेताळबाबांच्या महापुजेनंतर भाविकांनी दर्शनासाठी दिवसभर गर्दी केली होती. यात्रेसाठी मुंबई, पुण्यात नोकरी, व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेल्या गावकऱ्यांनी गाडीलगामध्ये हजेरी लावत यात्रोत्सवाचा आनंद लुटला.

वेताळबाबांचे मनोभावे दर्शन घेत मनोकामना पुर्ण करण्यासाठी साकडेही घातले.

मंगळवारी सायंकाळी राज्यात अग्रेसर असलेल्या दिपाली सुरेखा पुणेकर, नारायणगांव यांच्या लोकनाटय तमाशाचे आयोजन करण्यात आले होते. गाडीलगांवसह पंचक्रोशीतील तमाशा रसिकांनी लोकनाटयाचा आनंद लुटला. बुधवारी सकाळी हजेरीचा कार्यक्रम पार पडला. लोकनाटय तसेच हजेरीचा कार्यक्रम शांततेत पार पडल्याबददल यात्रा कमिटीच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले.

बुधवारी सायंकाळी निकाली कुस्त्यांच्या मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. या मैदानासाठी पारनेर तालुक्यासह नगर जिल्हा तसेच पुणे जिल्हयातील नामवंत पैलवानांनी हजेरी लावली होती. एकाचढ एक कुस्त्यांनी कुस्तीशोकीनांच्या डोळयांचे पारणे फेडले. कुस्त्यांचा थरार याची देही याची डोळा अनुभवण्यासाठी नगर, पुणे जिल्हयातील कुस्तीशोकीन गाडीलगांवमध्ये आवर्जुन उपस्थित होते.

शासकिय नोकरीनिमित्त विविध शहरांमध्ये वास्तव्यास असलेले गाडीलगांवचे भुषण पोलीस निरीक्षक संदीप गाडीलकर, ग्रामसेवक विष्णू गाडीलकर, भारतीय सैन्य दलातील जवान प्रवीण गाडीलकर, पोलीस प्रशासनातील कर्मचारी विकास सराफ व तुषार गाडीलकर, राखील पोलीस फोर्समधील अमोल चौगुले यांनी यात्रोत्सवानिमित्त गावामध्ये हजेरी लावल्याचे यात्रा कमिटीचे उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते सुरेश गाडीलकर यांनी सांगितले.

# ५० वर्षानंतर माजी विद्यार्थी एकत्र आले आणि भारावले !

न्यू इंग्लिश स्कूल १९७५ जुनी अकरावी बॅचचा स्नेह मेळावा

पारनेर : प्रतिनिधी

**५० वर्षानंतर वृद्धावस्थेतही आपल्या बालपणातील शाळेतली दिवस पुन्हा अनुभवास मिळणे हि सर्वात मोठी व आनंदाची बाब आहे. असं म्हणतात की बालपण गेलं की पुन्हा मिळत नाही. मात्र आज डिजिटल युगामुळे हे शक्य झाले आहे. सोशल मीडियाचा आधार घेत ५० वर्षानी पुन्हा एकदा बालपण जगण्याची संधी आता प्रत्येकाला मिळत आहे.न्यू इंग्लिश स्कूल पारनेरची १९७५ ची जुनी अकरावी बॅचचा स्नेह मेळावा शुक्रवार दि.५ रोजी ज्या शाळेत बालपणीचे शिक्षण घेतले त्याच शाळेत आयोजित करण्यात आला होता.**



शाळेतली माजी विद्यार्थी भागाजी शेरकर, चित्राताई ठुबे,हिराताई अंबुले,तसेच पांडुरंग शेळके यांनी चित्राताई ठूबे यांचे घरी मिटिंग घेउन ५० वर्षानंतर बालपणीच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करण्याचे सोशल मीडिया आधारे नियोजन केले. बरेच दिवसा पासून सर्व विद्यार्थ्यांचे मनात होते की आपण सर्व जन परत एकदा शाळेत एकत्र आले पाहिजे आणि त्या प्रमाणे योग आला आणि जूने पुराणे यार परत शाळेत मेळाव्याच्या निमित्ताने एकत्र आले. सर्व प्रथम दिवंगत गुरूजन, विद्यार्थी, विद्यार्थीनी यांना श्रद्धांजली वाहण्यात येऊन कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी शाळेचे हेड सर बरसले सर, ठाणगे सर, आंधळे सर, रोहकले सर, डॉ. शरद ठुबे, कल्पना ठुबे, आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथम गुरूजनांचे चरण स्पर्श करून कार्यक्रमाला सुरवात झाली. यावेळी उद्योजक भागाजी शेरकर ,सौ चित्रा ठुबे, सौ.हिरा, पांडुरंग शेळके, सुभाष कावरे, रामचंद्र ठुबे, विश्वनाथ औटी, पाराजी तारडे, सुशीला कार्ले, बन्सी ठाणगे, भैरु म्हस्के, सर्वांनी आपापली ५० वर्षाची वाटचाल व काळ कसा गेला याचा अनुभव मनोगतात सांगितला. यावेळी शेरकर यांना अनुभव सांगताना गहिवरून आले.

यावेळी उपस्थित शिक्षकानी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. माजी विदयार्थी विद्यार्थीनी यांच्याकडून शिक्षका प्रती आठवण म्हणुन त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. परत ५० वर्षा नंतरचे भेटीने प्रत्येकाने आनंदाने गहिवरून निरोप घेतला.

# संविधान बदलण्याचा दावा म्हणजे केवळ दिशाभूल

प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे यांची पत्रकार परिषदेत माहिती



नगर : प्रतिनिधी

**संविधान बदलण्याचा महाविकास आघाडीचा दावा म्हणजे केवळ जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असून, काँग्रेस पक्षाकडून जाणीवपुर्वक खोडसाळपणाची वक्तव्य केली जात असल्याचा आरोप दलित महासंघ आणि बहुजन महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे यांनी केला.**

अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ प्रा.मच्छिंद्र सकटे यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक घेवून महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले. त्यानंतर माध्यमांशी त्यांनी संवाद साधला.

आपली भूमीका विषद करताना प्रा.मच्छिंद्र सकटे म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारने आमच्या मागणी प्रमाणे आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभे करण्यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. तसेच घाटकोपर येथील त्यांचे निवास्थान राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी सुध्दा ३०५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याचा शासन आदेश जारी केला आहे. लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाची तसेच समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी बार्टीच्या धर्तीवर आर्टीची स्थापना करण्याची मागणीही महायुती सरकारनेच पुर्ण केल्यामुळे लोकसभा निवडणूकीत महायुतीला पाठींबा देण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

विकासाच्या मुद्यावरुन लक्ष विचलित करण्यासाठी महाविकास आघाडीने संविधान बदलाचा विषय खोडसाळपणे पुढे आणला आहे असा आरोप करुन, प्रा.सकटे यांनी सांगितले की, संविधानात बदल करता येईल परंतू ते रद्द करता येणार नाही. घटनेचा गाभा कोणालाही बदलता येणार नाही ही भूमिका स्पष्ट असताना सुध्दा केवळ समाजाची दिशाभूल करण्याचे काम विरोधकांकडून होत आहे. यावर सामान्य जनता विश्वास ठेवणार नाही. कारण सर्व दलित नेते महायुती सोबत आहेत. पवार आणि ठाकरेंवर आता विश्वास राहीलेला नाही. त्यामुळेच दलित महासंघ आणि मातंग समाजाचे सर्व कार्यकर्ते महायुतीच्या उमेदवारांच्या पाठीशी खंबरीपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी संजय चांदणे, अरुणा कांबळे यांच्यासह जिल्ह्यातील अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# वैभवशाली इतिहास समजण्यासाठी मोडी लिपीचे संवर्धन करा - सचिन ठाणगे

कान्हुर पठार : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथे आडवाटेचं पारनेर कला क्रिडा सांस्कृतिक युवा मंच व कान्हूर पठार ग्रामस्थ आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात पार पडली.**



उपक्रमशील शिक्षक सचिन ठाणगे यांनी मोडी लिपी प्रशिक्षण दिले. स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन कायझेन ॲकॅडमीचे संचालक महेश डाळिम्बकर यांनी केले .कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी शिरापूर शाळेचे उप प्राचार्य संपत गुंड सर होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक शिवव्याख्याते प्रा. तुषार ठुबे सर यांनी केले,. पाहुण्यांचा परिचय प्रा.संकेत ठाणगे सर यांनी करून दिला .उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले.

स्पर्धा परीक्षासंबंधी मार्गदर्शन करतांना डाळिम्बकर म्हणाले की स्पर्धा परीक्षांचा प्रयत्न जरूर करा पण त्याचबरोबर आपले शरीर व आपल्या कुंटुंबियाकडे लक्ष द्या आणि मोबाइलचा मोह टाळा .मोडी लिपी विषयी मार्गदर्शन करताना सचिन ठाणगे म्हणाले की, वैभवशाली इतिहास समजण्यासाठी मोडी लिपीचे संवर्धन करा, मोडी लिपीमधील लाखो कागदपत्रे पडून आहेत पण वाचक नाहीत.

मोडीचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोडी शिकावी ,मोडी लिपीच्या माध्यमातून नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. या कार्यशाळेचा लहानांपासून ते ऐंशी वर्षापर्यंतच्या जेष्ठ नागरीकांनी लाभ घेतला.प्रा.संपत गुंड यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.यावेळी प्रा.शिवव्याख्याते तुषार ठुबे, प्रा.संकेत ठाणगे, प्रा.संपत गुंड , संचालक कारभारी बाबर, शिक्षक नेते जयवंत ठाणगे, अनिल पारधी , प्रा. अशोक गुंड,भाऊसाहेब सावंत, रामदास लोंढे, प्रविण गावडे, गणेश फापाळे, मंजुश्री वाळुंज , सुषमा भालेकर ,शिवाजी वाळुंज , वैभव पोटे, संजीवनी ठुबे तसेच राजमाता क्लासचे व परिसरातील विद्यार्थी , शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु. साक्षी मंदीलकर , स्वागतगीत कु.आरुषी सोनावळे व आभार टीम सदस्या रितिका ठुबे यांनी मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com